NMRDA
नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण

# नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण

क्रमांक : कार्य.अभि.(नामप्रविप्रा) / ४३८६ — नागपूर, दिनांक : २८/०८/२०२०

प्रति,

मे. आर्य प्लॅनर्स ॲन्ड बिल्डर्स तर्फे
श्री. अजय श्रीधर जोशी व इतर १३ तर्फे
आमुख्त्यार श्री. टी. राजेन्द्र राव टी. निळकंठ राव व इतर १
रा. प्लॉट नं. ७, रिंग रोड, पडोळे चौक जवळ,
दिनदयाल नगर, राणाप्रताप नगर, नागपूर– ४४० ०२२.

**विषय :–** मौजा **पिपळा**, खसरा क्रमांक **१४५/अ/१,२,३,४, तह. नागपूर (ग्रा.)** जि. **नागपूर.** क्षेत्र **१.१५ हे.आर. (११५००.०० चौ.मी.)** जागा **निवासी** प्रयोजनार्थ महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम १९६६ चा कलम ४४, ४५ अन्वये सुधारीत अभिन्यास मंजूरी बाबत.

**संदर्भ :–** १) अर्जदाराचा दिनांक ०४/०७/२०११ रोजीचा अर्ज.
२) या कार्यालयाचे पत्र क्र. का.अभि.(मेट्रो)/९३९, दिनांक १५/०२/२०१३ रोजीचे पत्र.
३) उप अधीक्षक भूमी अभिलेख, नागपूर (ग्रा) यांचेमार्फत मोजणी ची 'क' प्रत मो.र.न. (अ.ता.बिगरशेती) ८५७/२०१३, दिनांक २०/०३/२०१३.
४) अर्जदाराचा दिनांक १७/०३/२०२० रोजीचा सुधारीत अभिन्यास मंजुरीबाबतचा अर्ज.

विषयांकित प्रकरणातील जागा "**निवासी**" वापरार्थ अभिन्यास मंजुरीसाठी उपरोक्त संदर्भांकित पत्र या कार्यालयाला प्राप्त झाले आहे. शासनाने दिनांक ०५.०१.२०१८ रोजी मंजुर केलेल्या विकास आराखडयाप्रमाणे उक्त जागा **"निवासी व :– EP-141, S98/M41 नुसार ;**

i) **Modification proposed by the Planning Authority is sanctioned. 18 mt. wide road to shifted as shown on plan. And land so released is included in Residential Zone.**

ii) **12 mt. wide East-West road to the North of library is extended towards West up to revised alignment of 18 mt. road**" या उपयोगाने प्रस्तावित आहे. योजनेतील तरतुदीनुसार या जागेत प्रस्तावित वापर अनुज्ञेय आहे. **मा. महानगर आयुक्त**, नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांनी **दिनांक १७/०७/२०२० रोजी सुधारीत अभिन्यासाला मोजणी कामी** मंजूरी प्रदान केली आहे.

या कार्यालयाद्वारे दिनांक १५/०२/२०१३ रोजी निर्गमित केलेले पत्र रद्द करण्यात येत असून सदर प्रकरणी **सुधारीत अभिन्यास मोजणी कामी** मंजुरी व सदर जागेस "**निवासी**" वापराकरिता आखणीची शिफारस खालील अटी शर्तीवर करण्यात येत आहे.

१. अभिन्यासातील भूखंडाचा उपयोग फक्त "**निवासी**" वापराकरिताच करण्यात यावा. तसेच भूखंडाचे विभाजन करू नये.

२. सभोवतालचे मंजूर अभिन्यासातील रस्त्यांशी योग्यरितीने समन्वय साधणे आवश्यक आहे.

३. अभिन्यासाची जागेवरील प्रत्यक्ष आखणी केल्यानंतर अभिन्यासातील राखून ठेवलेल्या खुल्या जागेचे क्षेत्रफळ अभिन्यासातील जागेच्या एकूण क्षेत्रफळाच्या १०% पेक्षा कमी असु नये.

४. सार्वजनिक सोयी व सुविधा करिता प्रस्तावित केलेल्या भुखंडाचे क्षेत्रफळ एकुण क्षेत्रफळाच्या १०% पेक्षा कमी असु नये.

५. अभिन्यासातील जागेत काही वृक्ष असल्यास, भूखंड आखतांना ते नष्ट न करता विद्यमान स्थितीत कायम ठेवावीत.

६. विषयांकित जमिनीतून विद्युत वाहिनी/दुरध्वनी वाहिनी जात असल्यास उक्त वाहिनी प्रस्तावाला बाधित होणार नाही अशा रितीने संबंधीत विभागाच्या अद्यावत नियमानुसार आवश्यक त्या सामासिक अंतरावर स्थानांतरीत करावी लागेल.

७. सदर रेखांकनामधील प्रस्तावित बांधकामास दिनांक ०५/०१/२०१८ रोजी मंजूर विकास नियंत्रण व प्रोत्साहसन नियमावली लागू राहील.

८. विषयांकित जागेलगत/जागेतून पाण्याचे स्त्रोत जात असल्यास संबंधित पाटबंधारे/जलसिंचन विभागाचे नाहरकत प्रमाणपत्र घ्यावे लागेल.

९. पावसाच्या पाण्याचे जलसंवर्धन (Rain Water Harvesting) ची व्यवस्था अभिन्यासात करावी लागेल.

१०. जमीनीचे मालकी हक्काबाबत महसूल विभागाचे स्तरावर खात्री करून घेणे आवश्यक राहील.

११. अभिन्यासात सार्वजनिक पाणी पुरवठयाची व्यवस्था जमिन मालक/विकासक यांनी स्वत:चे खर्चाने करणे आवश्यक राहील. अभिन्यासात निर्माण होणाऱ्या सांडपाण्याचा (*Black & Grey Water*) पुनर्वापर करण्यासाठी (बगीचा, लॅन्ड स्केपिंग, फिशींग, फिश पॉड, रस्ते सफाई, संडास व मुतारीत उपयोगासाठी व धुण्यासाठी) सांडपाणी व सांडपाण्याची प्रकीया करून विल्हेवाट करण्याची व्यवस्था जमिन मालक/विकासक यांनी स्वत:चे खर्चाने करणे आवश्यक राहील.

१२. अभिन्यासातील रस्ते, मलवाहिका, पावसाळी पाण्याची नलिका, जल वाहिनी, स्ट्रीट लाईट इत्यादि योग्य प्रकारे विकसीत करून ती संबंधित ग्रामपंचायतीस नियमानुसार हस्तांतरीत करावे लागतील. जेव्हा पर्यन्त विकास कामे ग्रामपंचायतीस हस्तांतरित होत नाही तेव्हा पर्यन्त जमीन मालकाने देखभाल दुरूस्तीची कामे करावी लागेल.

१३. विषयांकित जागेवर बांधकाम सुरू करण्यापूर्वी बांधकाम नकाशे नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरणकडून मंजूर करून घ्यावे लागेल.

१४. अभिन्यासाला अंतिम मंजूरी प्राप्त झाल्यावर नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरणासोबत सुधारीत विकास करारनामा करणे अर्जदारास बंधनकारक राहील.

१५. सार्वजनिक मल निस्सारण सयंत्र आणि अनुषंगिक बाबींकरीता लागणारे शुल्काचे अंशदानाचा भरणा करावा लागेल.

१६. विकासकास एकूण विकास शुल्काचे ५ टक्के अनामत रक्कम व ५ टक्के पर्यवेक्षण रक्कम शुल्काचा भरणा करावा लागेल.

१७. महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ (MRTP Act 1966) चे कलम १२४(ब) नूसार उक्त जागेच्या प्रचलित शिघ्रगणन मुल्य दराने येणारे एकुण मुल्याच्या ०.५ टक्के मुल्य जमीन विकासफंड (Land Development Fund) करिता अर्जदार / विकासकाकडून घ्यावे लागेल.

१८. अभिन्यासातील प्रस्तावित जागेमध्ये वेस्ट वॉटर रिसायकलिंग ट्रिटमेंट प्लॅन्टचे बांधकाम व इलेक्ट्रीक सबस्टेशन लावणे अनिवार्य राहील.

१९. रस्त्याच्या बांधकामासाठी तटबंदी (Embankment) २ मीटर पेक्षा जास्त उंचीचे असल्यास त्याचा भरणा करण्यासाठी फ्लाय ॲश चा वापर करण्यात यावा व तसेच प्राकलन तयार करण्यात यावे.

२०. फ्लाय ॲश नी बनवलेली टाईल्स, पेविंग ब्लॉक, विटा, सिमेंट इ. बांधकाम साहित्याचा उपयोग अनिवार्य राहील.

२१. मंजुर विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीतील नियम क्र. ३७ प्रमाणे (Affordable Plots) **खसरा क्र. १४५/अ/१,२,३,४, मौजा पिपळा** येथील प्रस्तावित अभिन्यासातील भूखंडके/ MHADA ला हस्तांतरीत करावी लागेल.

२२. अभिन्यासामध्ये घन कचरा व्यवस्थापन प्रकल्पाचे स्व:खर्चाने बांधकाम करुन त्याची निगा (**Maintenance**) राखण्याची जबाबदारी अभिन्यास धारक / विकासकावर राहिल.

२३. अभिन्यास नकाशात प्रस्तावित केलेली 'ॲमेनिटी स्पेस' ची जागा विकास नियंत्रण नियमावलीतील तरतुद क्रमांक २४.४ प्रमाणे नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाला विकास करुन विनामुल्य हस्तांतरीत केल्यास अनुज्ञेय चटई क्षेत्र (TDR) अनुज्ञेय करण्याची कार्यवाही करण्यात येईल.

२४. विकास करारनामा झाल्यानंतर प्रथम टप्पातील २० टक्के आराजीचे भुखंडाची (Plotable Area) यादीसह व सार्वजनिक सुख सुविधेची (Amenity Space) जागा मुक्त (Release) करण्याकरीता या विभागास अर्ज सादर करावे लागेल.

२५. या अभिन्यासाच्या लगतचे अभिन्यास मंजूरीच्या वेळी त्या अभिन्यास धारकाला आपल्या अभिन्यासातील स्त्यामधून पोच रस्ता द्यावा लागेल.

२६. यापुर्वी मोजणी कामी निर्गमित आखणीचे पत्र, अकृषक परवानगी कामी निर्गमित पत्राची मुळ प्रत व विकास करारनामासह मंजुर अभिन्यास नकाशाची मुळ प्रत अंतिम मंजुरीपुर्वी रद्द करणेकामी परत करावे लागेल.

२७. नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण सोबत अभिन्यासाच्या विकास करारनामा करण्यापुर्वी व भुखंडके बांधकामासाठी मुक्त (Release) झाल्याशिवाय भुखंडके विक्री करता येत नाही.

२८. विकासकास अंतिम मंजुरीपुर्वी सुधारीत मंजुरीप्रमाणे ७/१२ अभिलेख सादर करावा लागेल.

२९. अभिन्यासातील रस्त्याची व ओपन स्पेस ची जागा महाराष्ट्र शासनाचे नावाने आहे. अंतिम मंजुरीपुर्वी अभिन्यासाखालील क्षेत्र अर्जदार यांचे नावे होणे आवश्यक आहे. त्याबाबत शपथपत्र सादर करणे आवश्यक राहिल.

**प्रस्तावित अभिन्यासाची उपअधिक्षक, भूमी अभिलेख, नागपूर (ग्रामिण) यांचेकडून जागेवर आखणी करून मोजणी करुन घ्यावी. तात्पूरती मंजुर नकाशे आखणी नुसार मेळात असल्यास मुळ 'क' प्रतसह या कार्यालयास सादर कराव्यात आणि आखणीची छायाप्रत 'क' प्रत व तात्पूरती मंजुरीचे नकाशासह अभिन्यासात मुलभुत सुविधा पुरविण्याकरीता करावयाचे विकास कामाचे नकाशे सहाय्यक अभियंता (दक्षिण), नामप्रविप्रा यांचे कार्यालयात सादर करावे.**

**सहपत्र** : अभिन्यास नकाशा.
*(ख.क्र.१४५/अ/१,२,३,४, मौजा पिपळा, तह. नागपूर (ग्रा.)*

**कार्यकारी अभियंता–१**
**नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण**

**प्रतिलिपी –**

**१) उपअधिक्षक भूमि अभिलेख, नागपूर (ग्रामिण)** – उक्त अभिन्यासाची मौक्यावर मोजणी करून आखणी करण्यासाठी. (अभिन्यास नकाशा २ प्रतींत) व आखणी नकाशाची प्रत आखणी झाल्यावर या कार्यालयाला अभिलेखासाठी पाठविण्यात यावी.

२) कार्यकारी अभियंता–२, नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, नागपूर यांना माहितीस सादर.

३) सहाय्यक अभियंता (दक्षिण), नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, नागपूर यांना माहितीस व पुढील कार्यवाहीस अग्रेषीत.

४) मुख्य कार्यकारी अभियंता, म्हाडा, सिव्हील लाईन, नागपूर यांना माहितीस सादर.

–हस्ता–

**कार्यकारी अभियंता–१**
**नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण**